**<u>नियमीत दिवाणी मुकदमा क्र. ७८/२०१० मधील निशाणी ६९  खालील आदेश</u>**

प्रस्तुत अर्ज वादीने प्रतिवादी यांचे विरुध्द दिवाणी प्रक्रिया संहिता आदेश ३९ नियम १ व २ प्रमाणे तुर्तातुर्त ताकीद मिळणेसाठी दाखल केला आहे.

**<u>अर्जात वादीचे कथन की</u>**,

२. दावा कलम १अ ते १इ मध्ये वर्णन केलेल्या मौजे पाचेगाव बु., ता. सांगोला, जि. सोलापूर येथील गट क्र.१०९२, १०९५, १९८९, १०९६, १०९९ मधील येदू नामु बिले यांचे हिश्याची ८ आणे मिळकत व दावा कलम २अ ते २इ मध्ये वर्णन केलेल्या मौजे पाचेगाव बु., ता. सांगोला, जि. सोलापूर येथील गट क्र.१०९२, १०९५, १९८९, १०९६, १०९९ मधील धुरपाबाई ज्ञानु बिले यांनी वादीस भेट दिलेली ८ आणे मिळकत. सदर मिळकती हया या अर्जाचा वाद विषय आहे. यापुढे सदर मिळकतीस ''*वाद मिळकती*'' असे संबोधलेले आहे.

३. वादीच्या कथनानुसार, वादी व प्रतिवादी क.१ ते ३ यांचे मुळ पुरुष म्हणजे नामु बिले हे होते. दावा कलम १अ ते १इ व दावा कलम २अ ते २इ मध्ये नमुद मिळकती या सदरील नामु बिले यांच्या वडिलोपार्जित मिळकती होत्या. सदरील नामु बिले यांना ज्ञानु व येदू अशी दोन पुरुष अपत्ये असुन ज्ञानु नामू बिले यांचा धुरपाई हिचेशी विवाह झाला. सदर विवाहपासून त्यांना कोणतेही अपत्य नाही. तसेच येदू यांना वादी व प्रतिवादी क्र. २ व ३ ही अपत्ये आहेत. नामु बिले यांच्या पश्चात ज्ञानु व येदू यांचेमध्ये  दावा मिळकतीचे आपसात आणेवारी करुन वाटप झालेले

आहे. त्याप्रमाणे ज्ञानु व येदू यांना प्रत्येकी ८ आणे (१/२) हिस्सा मिळाला. तेव्हापासून ज्ञानु हा दावा कलम २अ ते २इ मधील मिळकतीत व येदू हा दावा कलम १अ ते १इ या मिळकतीत मालकी हक्काने कब्जे वहिवाट करत असुन त्याचा उपभोग घेवुन उत्पन्न घेत होते. सन १९३५ मध्ये ज्ञानु मयत झाला. त्याचे पश्चात त्यांची पत्नी धुरपाबाई उर्फ द्रौपदीबाई ज्ञानु बिले यांचे नावाची नोंद हक्कपत्रकी झाली.

४. वादी व प्रतिवादी क्र. २ व ३ यांचे वडील येदू नामू बिले हे दि.१०/०३/१९५९ रोजी मयत झाले. त्यांचे पश्चात त्यांच्या हिश्यापूरती वादीची नोंद एकत्र कुटुंब मॅनेजर म्हणुन ७/१२ सदरी झाली. तेव्हापासून दावा कलम १अ ते १इ या मिळकतीमध्ये वादीची स्वतः करीता व प्रतिवादी क्र. २ व ३ यांचे करीता प्रत्यक्ष कब्जे वहिवाट आहे. वादी हा प्रतिवादी क्र.२ व ३, लक्ष्मीबाई व धुरपाबाई यांचा सांभाळ करत होता. धुरपाबाई हिचा हिस्सा म्हणजे दावा कलम २अ ते २इ या मिळकती वादी हा वहिवाटून उत्पन्न घेवुन तो धुरपाबाई हिस देत होता. वादी हा सैन्यदलात असता धुरपाबाई व लक्ष्मीबाई यांना मनीऑर्डने पैसे पाठवत होता.

५. श्रीमती धुरपाबाई ज्ञानु बिले यांनी त्यांचे हयातीत दि.०३/११/१९६९ रोजी मा. तहसिलदार, सांगोला यांचेकडे अर्ज देवुन त्यांचे नावावरील जमीन त्यांना मुलबाळ नसल्यामुळे व त्यांचे वय झाले असल्यामुळे वादी यांचे नावावर करुन दिली. त्याप्रमाणे सदर धुरपाबाई हिचे ८ आणे (१/२) हिस्सा म्हणजे दावा कलम २अ ते २इ या मिळकती वादीला भेट स्वरुपात मिळाल्यामुळे त्या मिळकतीत वादीची प्रत्यक्ष कब्जेवहिवाट आहे. सदर मिळकती वादीच्या नावे नोंदविल्यानंतर

धुरपाबाई ही सुमारे १० वर्षानी मयत झाली. त्याप्रमाणे वादी हा धुरपाबाई हिचे दावा कलम २अ ते २इ या मिळकती तसेच येदू बिले यांची दावा कलम १अ ते १इ या मिळकतींचे वहिवाट करुन उत्पन्न घेत होता व प्रतिवादी क्र. २ व ३ यांचा सांभाळ करत होता.

६. प्रतिवादी क्र.१ ते ३ यांनी वादीचे दावा कलम १अ ते १इ मधील मिळकतीतील सामाईकातील कब्जे वहिवाटीस, वापर उपभोगास दावा मिळकतीत स्वतंत्र मालकी हक्क सांगून हरकत अडथळा करणारी कृत्ये करु लागले. तसेच दावा कलम २अ ते २इ या मिळकतीत देखील त्याचे कब्जे वहिवाटीस हरकत अडथळा करु लागले. वादीने याबाबत प्रतिवादी क्र. २ व ३ यांना समजावुन सांगण्याचा प्रयत्न केला. परंतु, प्रतिवादी क्र. २ व ३ हे रेव्हेन्यु अधिका-यांना हाताशी घेवुन स्वतःची नावे अनाधिकाराने व जादा क्षेत्रास लावण्याच्या प्रयत्नात आहे. प्रतिवादी क्र. २ व ३ यांच्या गैरकृत्यांमुळे वादीचे दावा कलम १अ ते १इ तसेच २अ ते २इ या मिळकतींमध्ये वहिवाटीस धोका निर्माण झाला आहे व त्यातून त्याला उत्पन्न घेणे अशक्य झालेले आहे. प्रतिवादी क्र. २ व ३ हे दावा कलम १अ ते १इ मधील समाईक वहिवाटीतून अर्धचंद्र वादीस देण्याच्या प्रयत्नात आहेत. त्यामुळे वादीचे मोठे नुकसान होणार आहे. प्रतिवादी क्र.२ व ३ हे त्यांच्या गैरकृत्यांत यशस्वी झाल्यास वादीचे कधीही न भरुन येणारे नुकसान होणार आहे.

७. सबब, वादीने दावा कलम १अ ते १इ या मिळकतीमध्ये त्याचा १/४ हिस्सा वाटप होवुन पृथक कब्जा मिळणेसाठी तसेच दावा कलम २अ ते २इ या मिळकतीतील वादीच्या स्वतंत्र मालकी व कब्जे वहिवाटीस प्रतिवादी क्र. २ व ३ यांनी हरकत अडथळा करु नये म्हणुन, तसेच

दावा कलम १अ ते १इ या मिळकतीमधील सामाईकात वापर उपभोगास तसेच विहिरीतून पाणी घेवुन वाद मिळकतीतील पिकांना देवुन त्यापासून उत्पन्न घेण्यास हरकत अडथळा करु नये म्हणुन त्यांचे विरुध्द तुर्तातुर्त ताकीदीची मागणीसाठी सदरचा अर्ज दाखल केला आहे.

८. प्रतिवादी क्र.२ व ३ यांनी न्यायालयात हजर होवुन निशाणी क्र.७२ वर कैफियत व म्हणणे दाखल केले असुन त्यामध्ये वादीच्या दाव्यातील कथने त्यांनी नाकारलेले आहेत. प्रतिवादी क्र.२ व ३ यांच्या कथनानुसार अर्जातील जमीनी या मुळात वडिलार्जित असून या जमीनी वादी, प्रतिवादी यांचे आजोबा नामू बिले यांचे असून त्यांचे मृत्युनंतर मुले येदू व ज्ञानू यांचे वहिवाटीस होत्या. नामू यांनी त्यांचे हयातील दावा मिळकतीचे वाटप करुन दिलेले नव्हते व नाही. तसेच ज्ञानु हे एकत्र राहत असताना अपत्यहीन मयत झाले. त्यानंतर त्यांची पत्नी धुरपाबाई हिचा सांभाळ वादी व प्रतिवादी क्र.१ ते ४ यांनी केला. ज्ञानु यांचे मृत्युनंतर सर्व एकत्र कुटुंबाच्या मिळकती येदू हेच वहिवाटीत होते. येदू हे दि.१०/०३/१९५९ रोजी मयत झाले. त्यानंतर वादी व प्रतिवादींची वहिवाट दावा मिळकतीमध्ये होती. धुरपाबाई यांची कधीही वेगळी वहिवाट नव्हती. सन १९६५ ते १९८० पर्यत वादी हा नोकरीसाठी परवागी होता. त्यामुळे धुरपाबाई हिचा सांभाळ त्याने केलेला नाही. याउलट, ती प्रतिवादी क्र.१ ते ४ व लक्ष्मीबाई यांचेकडे राहण्यास होती. वादी व प्रतिवादी क्र.१ ते ४ यांचेवर तिचे सारखेच प्रेम होते. वादीने धुरपाबाई यांच्या जमीन मिळकतीसंदर्भात लावलेल्या नोंदी या मुळातच बेकायदेशीर आहेत. दि.२३/१०/१९५९ रोजी वादी याचे नावाची नोंद फेरफार क्र.१४७९ अन्वये एकत्र कुटुंब मॅनेजर म्हणुन दावा मिळकतीस झालेली आहे. त्यानंतर वादीच्या संमतीने फेरफार क्र.८५५ ची नोंद होवुन वादी व प्रतिवादी क्र.१ ते ४ यांच्या नावाची नोंद

दावा मिळकतीच्या ७/१२ उतारा सदरी झालेली आहे. सदर नोंदीविरुध्द वादीने अपील दाखल केलेले नाही.

९. सन १९९७ मध्ये दावा मिळकतीचे वादी व प्रतिवादी क्र.१ ते ३ यांचेमध्ये तोंडी वाटप झाले. सदर वाटपामध्ये गट क्र.१०९२ पैकी पूर्वेकडील ४४ आर क्षेत्र प्रतिवादी क्र.१ व पश्चिमेकडील ४५ आर क्षेत्र प्रतिवादी क्र.३ यांना देण्यात आले. गट क्र.१०९५ पैकी दक्षिण-उत्तर चालीचे ६३.५ आर क्षेत्र प्रतिवादी क्र.१ व ६३.५ आर क्षेत्र प्रतिवादी क्र.३ यांना देण्यात आले. सदर जमीनीला लागुन १ हे. २२ आर क्षेत्र प्रतिवादी क्र.२ व सदर जमीनीला लागुन उत्तर बाजुची १ हे. २० आर क्षेत्र वादीला देण्यात आली. गट क्र.१०९९ चे चार हिस्से करण्यात आले असुन दक्षिण बाजुचा पहिला हिस्सा प्रतिवादी क्र.२, त्यालगत दुसरा हिस्सा प्रतिवादी क्र.३, त्याच्या लगत तिसरा हिस्सा वादीस व त्यालगतचा हिस्सा प्रतिवादी क्र.१ यांना देण्यात आला. सदर वाटपाप्रमाणे वादी व प्रतिवादींची दावा मिळकतीमध्ये वहिवाट आहे. परंतु, सदरचे वाटप हे तोंडी झाल्यामुळे त्याचा अंमल ७/१२ उतारासदरी आलेला नाही. त्याचा गैरफायदा घेवुन प्रस्तुतचा दावा दाखल केलेला आहे. या सर्व कारणांमुळे प्रतिवादी क्र.२ व ३ यांनी वादीचा दावा नामंजूर करणेची विनंती केली आहे.

१०. वादीतर्फे विद्वान विधीज्ञ श्री.डी.व्ही. भोसेकर यांचा युक्तिवाद ऐकला. प्रतिवादी क्र. २ व ३ तर्फे विद्वान विधीज्ञ श्री.व्ही.बी. चव्हाण यांचा युक्तिवाद ऐकला.

११. वादी प्रतिवादींची कथने व अभिलेखावरील कागदपत्रांचे अवलोकन केले. त्यांचा

सारासार विचार करुन याकामी खालील मुद्दे मी उपस्थित केले आहेत. त्यानुसार त्यांची कारणमिमांसा पुढे दिली आहे.

| **अ.क्र.** | **मुद्दे** | **निष्कर्ष** |
|---|---|---|
| १. | वादीला सकृतदर्शनी केस आहे काय? | नाही. |
| २. | न्यायाच्या तौलानिक सोईचे समतोल तत्व वादीच्या बाजूने झुकणारे आहे काय? | नाही. |
| ३. | अर्ज मंजूर न झालेस वादीचे कधीही न भरुन येणारे नुकसान संभवते काय? | नाही. |
| ४. | आदेश काय? | अंतिम आदेशानुसार |

**मुद्दे क्रमांक १ ते ४ बाबत :-**

१२. वादीच्या कथनानुसार दावा मिळकती या मुळच्या नामु बिले यांच्या मालकीच्या असुन त्यांच्या मृत्युनंतर सदर मिळकती ज्ञानु बिले व येदू बिले यांना वारसा हक्काने मिळाल्या. त्यानंतर ज्ञानु बिले व येदू बिले यांच्यामध्ये वाटप होवुन दावा मिळकतीपैकी १अ ते १इ या मिळकती येदू बिले व २अ ते २इ या मिळकती ज्ञानु बिले यांना देण्यात आल्या होत्या. ज्ञानु बिले यांच्या मृत्युनंतर त्यांना त्यांची पत्नी धुरपाबाई हिच फक्त वारस होती. तिने तिच्या हयातीत दावा कलम २अ व २इ या मिळकती वादीला भेट दिल्या. त्याप्रमाणे वादीची नोंद दावा मिळकती सदरी फेरफार क्र.१८३६ ने झाली आहे. प्रतिवादींनी दावा मिळकती हया नामु बिले यांच्या मालकीच्या असल्याचे व त्यांच्या मृत्युनंतर सदर मिळकती ज्ञानु बिले व येदू बिले यांना वारसा हक्काने मिळाल्याचे मान्य

केले आहे. परंतु, त्यांच्यामध्ये वाटप झाल्याचे व ज्ञानु यास वाटपात आलेली मिळकत त्याची पत्नी धुरपाबाई हिने वादीस भेट दिल्याचे प्रतिवादींनी नाकारलेले आहे.

१३. दावा कलम २अ ते २इ मधील मिळकत धुरपाबाई हिने वादीस भेट दिल्याचे सिध्द करण्यासाठी वादी हा फेरफार क्र.१८३६ वर विसंबुन राहिलेला आहे. सदर फेरफार क्र.१८३६ चे अवलोकन केले असता असे दिसून येते की, सदर फेरफार अन्वये धुरपाबाई हिने तिच्या मालकीच्या मिळकती वादीच्या नावावर लावणेसाठी अर्ज केला होता. त्याप्रमाणे सदर मिळकतींची नोंद वादीच्या नावे झालेली आहे. परंतु, सदर मिळकत वादीच्या नावे हस्तांतरीत करताना कोणताही नोंदणीकृत दस्त झाल्याचे सदर फेरफार नोंदीमध्ये नमुद केलेले नाही. शिवाय, सदर मिळकती वादीच्या नावे नोंदणीकृत दस्ताने आल्याबाबतचे कथन वादीने त्याच्या दाव्यात केलेले नाही. सदर मिळकती या जमीन मिळकती असुन त्याची किंमत रक्कम रुपये १००/- पेक्षा जास्त आहे. त्यामुळे सदर मिळकतीचे हस्तांतरण करताना ते नोंदणीकृत दस्ताच्या आधारे होणे आवश्यक आहे. परंतु, प्रस्तुत प्रकरणात धुरपाबाई हिने तिच्या नावे असलेले क्षेत्र वादीस कोणत्याही नोंदणीकृत दस्ताने हस्तांतरीत केलेले नाही. अशा परिस्थितीत फक्त फेरफार नोंदीच्या आधारे सदर मिळकतींची मालकी फक्त वादीस हस्तांतरीत झाली असे म्हणता येणार नाही.

१४. दावा कलम २अ ते २इ मधील मिळकती कोणत्याही नोंदणीकृत दस्ताने वादींना हस्तांतरीत झालेल्या नाहीत. त्यामुळे वादी हे एकटेच सदर मिळकतींचे मालक झाले असे म्हणता येणार नाही. याउलट, मुळ मालक धुरपाबाई या मयत झाल्यानंतर वादी व प्रतिवादी क्र.१ ते ४ हे

तिचे वारस आहेत. त्यामुळे वादी व प्रतिवादी क्र.१ ते ४ यांना दावा कलम २अ ते २इ या मिळकतीमध्ये मालकी हक्क प्राप्त होतो. शिवाय, फेरफार क्र.८५५ चे अवलोकन केले असता असे दिसून येते की, सदर फेरफार सन १९९७ रोजी मंजूर झाला असून त्यामध्ये असे नमुद केले आहे की, येदू नामु बिले व धुरपाबाई नामु बिले हे दि.११/०३/१९५९ व ११/०५/१९७९ रोजी मयत झाले. त्यांना ए.कु. मॅनेजर म्हणुन रावसाहेब येदू बिले यांची नोंद फेरफार क्र.१४७९ ने दि.२३/१०/१९५९ अन्वये झाली. सदर नोंदीत भावांची नावे नोंदणी करीता रावसाहेब येदू बिले यांनी नोटीसीव्दारे संमती दिलेली आहे. त्याप्रमाणे सर्व दावा मिळकती वादी व प्रतिवादी क्र.१ ते ४ यांच्या नावाची नोंद झाली. सदर फेरफार नोंदी वरुन हे स्पष्ट होते की, वादीने स्वतः दावा कलम २अ ते २इ या मिळकतींना प्रतिवादी क्र.१ ते ४ यांच्या नावाची नोंद होणेसाठी संमती दिलेली आहे व त्याप्रमाणे प्रतिवादी क्र.१ ते ४ यांच्या नावाची नोंद दावा मिळकतीस झालेली आहे. त्यामुळे सदर मिळकती हया वादीच्या एकटयाच्या मालकी वहिवाटीच्या मिळकती आहेत हे प्रथमदर्शनी सिध्द होत नाही. याउलट, सदर मिळकती हया वादी व प्रतिवादी क्र.१ ते ४ यांच्या एकत्र कुटुंबाच्या मिळकती असल्याचे प्रथमदर्शनी सिध्द होते. सदर मिळकती हया एकत्र कुटुंबाच्या मिळकती असल्यामुळे सदर मिळकती वहिवाटण्याचा वादी व प्रतिवादींना हक्क व अधिकार आहे. त्यामुळे सदर मिळकतीच्या स्वतंत्र वहिवाटीस हरकत अडथळा करु नये म्हणुन वादीला प्रतिवादी क्र.१ ते ४ यांचेविरुध्द तुर्तातुर्त ताकीद मागणेचा अधिकार नाही.

१५. वादीच्या कथनानुसार दावा कलम १अ ते १इ या मिळकती त्यांच्या वडिलांच्या असुन सदर मिळकतींमध्ये वादी व प्रतिवादींमध्ये वाटप झालेले नाही. याउलट, प्रतिवादींच्या

कथनानुसार सर्व दावा मिळकतींचे वादी व प्रतिवादींमध्ये सन १९९७ मध्ये तोंडी वाटप झालेले आहे. दावा मिळकतींचे तोंडी वाटप झाले होते हे सिध्द करण्यासाठी प्रतिवादींनी दगडु कृष्णा काबुडगे व शिवाजी दाजी घोडके यांचे शपथपत्र सादर केलेले आहे. त्यांनी त्यांच्या शपथपत्रामध्ये वादी व प्रतिवादीमध्ये वाटप झाल्याचे नमुद केलेले आहे. पंरतु, तसे वाटप झाल्याबाबत प्रतिवादींनी कोणताही कागदोपत्री पुरावा न्यायालयात सादर केलेला नाही. याउलट, दावा मिळकतींच्या ७/१२ उतांराचे अवलोकन केले असता असे दिसून येते की, दावा मिळकती हया वादी व प्रतिवादींमध्ये सामाईक वहिवाटीस आहेत. दावा मिळकतींचे वाटप झाल्याबाबत सदर ७/१२ उतारांमध्ये नमुद केलेले नाही. शिवाय, वाटपाप्रमाणे वादी व प्रतिवादींच्या वेगळेवेगळे वहिवाटी असल्याबाबत कोणताही कागदोपत्री पुरावा प्रतिवादींनी सादर केलेला नाही. त्यामुळे दावा मिळकतींचे वादी व प्रतिवादींमध्ये वाटप झाले होते हे प्रथमदर्शनी सिध्द होत नाही. यावरुन दावा कलम १अ ते १इ यामध्ये वादी व प्रतिवादींची सामाईक कब्जे वहिवाट असल्याचे दिसून येते. वादीच्या कथनानुसार दावा कलम १अ ते १इ या मिळकती तो ए.कु.मॅ. म्हणुन स्वतःकरीता व प्रतिवादी यांचे करीता वहिवाटुन उत्पन्न घेत होता व आहे. यावरुन देखील वादी व प्रतिवादींचा दावा मिळकतीमध्ये एकत्र कब्जा असल्याचे स्पष्ट होते. सदर मिळकतींमध्ये वादीचा एकटयाचा कब्जा असल्याचे वादीने सिध्द केलेले नाही. अशा परिस्थितीत प्रतिवादी क्र.१ ते ४ हे वादीचे सह-हिस्सेदार आहेत. त्यामुळे वादीने मागणी केल्याप्रमाणे तो प्रतिवादी क्र.१ ते ४ यांचे विरुध्द तुर्तातुर्त ताकीद मिळणेस पात्र नाही.

१६. वरील विवेचनावरुन हे स्पष्ट होते की, दावा मिळकतींमध्ये वादीचा स्वतंत्र कब्जा अगर मालकी असल्याचे वादीने सिध्द केलेले नाही. याउलट, वादी व प्रतिवादी हे सह-हिस्सेदार

आहेत, त्यामुळे वादीने मागणी केल्याप्रमाणे प्रतिवादींविरुध्द तुर्तातुर्त ताकीद मिळणेस पात्र नाही. सबब, प्रथमदर्शनी केस व न्यायाचा तौलानिक समतोल हा वादीच्या बाजुने नसल्याचे सिध्द होते. वादीने मागणी केल्याप्रमाणे तुर्तातुर्त ताकीद मंजूर केल्यास वादी हा एकटाच दावा मिळकतीमध्ये वहिवाट करुन प्रतिवादींना दावा मिळकतीतून हुसकावून लावण्याची शक्यता नाकारता येणार नाही. त्यामुळे प्रतिवादींचे कधीही न भरुन येणारे नुकसान होणार आहे. याउलट, अर्ज नामंजूर केल्यास वादीचे कोणतेही नुकसान होणार नाही. सबब, मुद्दा क्र.१ ते ३ चे उत्तर नकारार्थी नोंदवत आहे व मुद्दा क्र.४ साठी खालील आदेश पारीत करीत आहे-

## आदेश

वादीचा अर्ज (नि.६९) खर्चासह नामंजूर करण्यात येत आहे.

(पी.ए.पाटील )

दिनांक १२.०२.२०१९. सह दिवाणी न्यायाधीश, कनिष्ठ स्तर,सांगोला.

***CERTIFICATE***

I affirm that the contents of this PDF file Judgment/Order is same word to word as per the original Judgment/order:-

a) Name of the Stenographer : A. S. Bakale.

b) Court : Jt. Civil Judge Jr. Division & J. M. F. C, Sangola.

c) Judgment/Order signed by PO on : 12.02.2019.

d) Judgment/Order uploaded on : 14.02.2019.